**नि.दि.दा. क्र. ४५/२०१८**
**कृष्णा उर्फ दादु विरुध्द ललिता**
**नि. क्र. ४६ पुढे सुरु.**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु.**
**प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्रीमती एम. एस. सावंत**

१०. मी बी कॉम पर्यंत शिकलो आहे. मला मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आहे परंतु इंग्रजी भाषेवर माझे प्रभुत्व नाही. माझे आजोबा वाघु धिवार अशिक्षीत होते. ते अंगठा किंवा सही करायचे या बाबत मला सांगता येणार नाही. दावा मिळकती महार वतनाची असल्याने ती विक्री करण्याकरीता संबंधीत शासकीय विभागाची पूर्व परवानगी लागत असल्याबात मला सांगता येणार नाही. तशी परवानगी माझ्या आजोबांनी दावा मिळकतीचा विक्री व्यवहार करण्यापूर्वी घेतली होती किंवा कसे या बाबत मला माहिती नाही. मी प्रस्तुत दावा दाखल करण्यापूर्वी दावा मिळकतीच्या विक्री व्यवहाराची खरेदीखताची प्रत दुय्यम निबंधक कार्यालयातुन प्राप्त केली नव्हती व ती पडताळुन पाहिली नव्हती. मी प्रस्तुत दावा सदरहु खेरदीखत माझ्यावर बंधनकारक नाही या मागणी करीता केला आहे. तसे खरेदीखत झाले असल्याचे मला मान्य नाही.

११. आता मला दस्त यादी नि.क्र.६८ सह दाखल दस्त क्र.१ दाखविण्यात आला. (यावेळी वादीचे विधीज्ञांनी सदरील दस्त हा प्रस्तुत साक्षीदाराशी संबंधीत नसल्याने त्यास तो दाखविता येणार नाही अशी हरकत घेतली. यावर प्रतिवादीचे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, साक्षीदार हा उलटतपासणी कामी साक्षी पिंज–यात उभा असताना त्यास कोणताही दस्त दाखविता येवु शकतो. घेण्यात आलेला आक्षेप व त्यावर करण्यात आलेला युक्तीवाद यांचा विचार करता प्रस्तुत साक्षीदाराची उलटतपासणी सुरु असल्याने त्यास मुळ दस्त दाखविण्याकरीता कोणतीही कायदेशीर बाधा नाही तथापी सदरील दस्तातील मजकुर प्रस्तुत साक्षीदार शाबीत करु शकतो किवा कसे ही पूर्णपणे वेगळी बाब आहे. त्यामुळे सदरहु दस्त साक्षीदारास दाखविण्याची परवानगी देण्यात येते. ) मला प्रस्तुत दस्तावर लिहुन देणार म्हणून कुणाचे नाव आहे हे मी सांगू शकत नाही. मी सन १९८२ साली झालेली खरेदीखते पाहिलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, तरीसुध्दा मी त्या बाबत ती आम्हा वादींवर बंधनकारक नसल्याचा

जाहीर ठराव मागत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांनी दावा मिळकतीबाबत केलेल्या व्यवहाराबाबत मला कोणतीही माहिती नाही. साक्षीदार स्वतहुन सांगतो की, त्या व्यवहारांची माहिती मला सन २०१५ साली मी त्या संबंधीत कागदपत्रे प्राप्त केल्यानंतर झाली. सात बारा नोंदीच्या आधारे एखादी मिळकत तबदील करता येत असल्याबाबत मला माहिती नाही. मला सन २०१५ पासुन दावा मिळकती बाबत तक्रार करण्यापासुन कोणीही अडविले नव्हते. मी जे खरेदीखत आव्हानीत केले त्यांचे नोंदणी नंबर सांगू शकत नाहीत. मी सदरील खरेदीखते माझ्या आजोबांकडून बळजबरीने व धाकधपटशा करुन करुन घेतल्याबाबत ऐकीव माहितीच्या आधारे कथन केले आहे. मी अशी माहिती ऐकली होती की प्रतिवादी व त्यांच्या कुटूंबीयांनी धाकधपटशा करुन महार वतनाच्या जमिनी बळकावल्या आहेत. तसा कुठलाही विशीष्ट प्रसंग मला कुणीही सांगितला नाही. दावा मिळकतीच्या अभीलेखावर ज्या खरेदीदस्तांच्या आधारे नोंदी झालेल्या आहेत ती खरेदीखते मी या दाव्याद्वारे आव्हानीत केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा मिळकत व त्या संबंधातील खरोदीखताबाबत कोणतीही माहिती नसताना माझ्या स्वतःकरीता व इतर वादींकरीता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काहीही नाही.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

(आर. एम. भेंडे)

दिनांक :–३०/०६/२०२३

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, वाई.